# पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. ११३/२०१०

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने दिनांक १४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या राजपत्रान्वये विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी किंवा नामनिर्देशित होण्यासाठीच्या पात्रता शर्ती निश्चित केलेल्या आहेत. या पात्रता शर्तींच्या ग्राह्यतेबाबतचे धोरण ठरविण्यासाठी मा. व्यवस्थापन परिषदेने एक समिती गठित केली होती. ह्या समितीने सादर केलेला अहवाल मा. व्यवस्थापन परिषदेने, दिनांक १० जुलै, २०१० रोजीच्या सभेत स्वीकारलेली आहे.

विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या पात्रता शर्तींच्या ग्राह्यतेबाबतचे नियम पुढीलप्रमाणे आहेत. :-

१. शिक्षक/पदव्युत्तर शिक्षक/प्राचार्य यामधून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, मधील तरतूदीनुसार विविध अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी 'ख्यातनाम/प्रख्यात राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय संशोधन, जर्नल्समध्ये बारकाईने पुनर्विलोकन केलेले किमान तीन संशोधन पेपर प्रकाशित केलेले असावेत' या पात्रता शर्तीच्या ग्राह्यतेसाठी अशा जर्नल्सची माहिती यथावकाश ह्या परिपत्रकाचे परिशिष्ट म्हणून प्रसिध्द करण्यात येईल.

२. शिक्षक/पद्व्युत्तर शिक्षक यामधून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार विविध अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी विद्यापीठ पातळीवर केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पांतर्गत पेपरसेटर / परीक्षक/ नियामक/अध्यक्ष/समन्वयक म्हणून किमान पाच वेळा काम केलेले असावे. या अटींच्या ग्राह्यतेसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी कागदपत्रांची पडताळणी करून निर्गमित केलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावे.

३. २००९ पूर्वी प्रथम वर्ष प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेसाठी पर्यवेक्षक या संदर्भात प्राचार्यांनी महाविद्यालयातील कागदपत्रे तपासून संबंधित प्राध्यापकास प्राचार्यांच्या सहीने निर्गमित केलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावे.

४. २००९-१० पासून प्रथमवर्ष प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेसाठी प्राश्निक, परीक्षक, पर्यवेक्षक किंवा परीक्षेच्या इतर नेमणूका विद्यापीठाच्या विहित नमून्यात संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांच्या स्वाक्षरीनिशी निर्गमित कराव्यात व अशाप्रकारे परीक्षेचे केलेले काम निवडणूक लढविण्याच्या कामी ग्राह्य धरण्यात यावे.

५. विद्यापीठाची गुणपत्रिका ८० : २० अशी असते. यातील २० गुण हे देखील विद्यापीठस्तरावर असतात. त्यामुळे या स्तराचे परीक्षक, प्राश्निक, पर्यवेक्षक हे देखील ग्राह्य धरण्यात यावेत.

६. जे विषय महाविद्यालयात शिकविले जातात, त्या सर्वसाधारण/विशेष विषय शिकविणा-या विभागप्रमुखांचे नाव अभ्यास मंडळ मतदार यादीत घ्यावे.

७. महाराष्ट्र शासन राजपत्र भाग ४-ब दिनांक १४ सप्टेंबर, २००९ यामध्ये कलम २५(२)(पी) मध्ये परीक्षक हा शब्द मराठी आवृत्तीमध्ये आहे तो इंग्रजीमध्ये देखील ग्राह्य धरावा. तसेच कलम ३७(२)(बी) मधील परीक्षक हा शब्द आहे तो इंग्रजी आवृत्तीमध्ये देखील ग्राह्य धरावा.

८. प्राचार्यांच्या बाबतीत संबंधित महाविद्यालय चालवीत असलेल्या संस्थेच्या अध्यक्ष/सचिवांचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावे.

९. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २५ आणि २९ मधील तरतूदीनुसार अनुक्रमे अधिसभा आणि विद्यापरिषदेवर संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यक्ष/सचिव/प्रतिनिधी यांच्या निवडणूकीसंबंधीच्या 'देशातील सर्वोच्च संस्थांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या अपेक्स संस्था उदा. NAAC,NBA याव्दारे मान्यता प्राप्त संस्थांच्या किंवा विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) अधिनियम २ (एफ) आणि १२ (बी) अन्वये मान्यताप्राप्त संस्थेचा प्रतिनिधी असावा' या अटींच्या ग्राह्यतेसाठी संबंधित संस्था चालवीत असलेल्या कोणत्याही किमान एका महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्थेस NAAC/NBA इत्यादि आणि विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियमाच्या कलम २ (एफ) व १२(बी) अन्वये प्राप्त मान्यता पत्राच्या प्रती ग्राह्य धरण्यात याव्यात.

१०. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २५ मधील तरतूदीनुसार अधिसभेवरील नोंदणीकृत पदवीधरांच्या निवडणूकीसाठी संलग्नीत महाविद्यालये, संस्था, मान्यताप्राप्त परिसंस्था कार्यालयात कामे करणारा नसावा, या पात्रता शर्तीचा इंग्रजी अनुवाद (Shall not be an office bearer of any Affiliated College, Institutions, Recognized Institutions) लक्षात घेता उमेदवार हा कोणत्याही संलग्नीत महाविद्यालय, संस्था, मान्यताप्राप्त संस्थेचा पदाधिकारी/विश्वस्त असू नये असे गृहित धरावे व तशा आशयाचे प्रतिज्ञापत्र संबंधित उमेदवाराने नामनिर्देशन अर्जासोबत सादर करावे.

११. कलम ९९(५) अन्वये नोंदणीकृत पदवीधरांची मतदार यादी तयार करीत असताना पात्रता शर्तीच्या पोटकलम ४ मध्ये उल्लेख केलेला पदवीधर हा निवडणूकीपूर्वी किमान १० वर्षे अगोदर पदवीधर झालेला असणे अपेक्षित आहे. पदवी प्रमाणपत्र तारीख नंतरची असली तरी असे पदवीधारक कलम २५(२)(आर) मधील तरतूदीप्रमाणे निवडणूक लढविण्यास पात्र राहतील.

१२. वाणिज्य विद्याशाखेच्या अधिष्ठाता यांनी दिलेल्या विषय वर्गीकरण या संदर्भातील यादीचा विचार करण्यात आला व सदर सर्व विषय मान्य करण्यात आले.

१३ प्राचार्य, शिक्षक व विभागप्रमुख इतर महाविद्यालयातून/विद्यापीठातून बदलीने/नियुक्तीने आलेले असतील तर त्यांचा पूर्वीच्या महाविद्यालय/विद्यापीठाचा शैक्षणिक/विभागप्रमुख पदाचा अनुभव ग्राहय धरण्यात यावा.

हे परिपत्रक विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर Act/Statute या लिंकवर उपलब्ध आहे.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )<br>
संदर्भ क्र. पुविनि/ )<br>
दिनांक : २ ऑगस्ट, २०१० )

मा. कुलगुरू यांच्या आदेशावरुन

( डॉ. मा. ल. जाधव )<br>
**कुलसचिव**

**(टीप : ज्या मतदार संघातून उमेदवारी अर्ज भरावयाचा आहे, त्याप्रमाणे वरील नियम लागू होतील. )**